D Y PATIL
COLLEGE of
AGRICULTURE
TALSANDE

(Affiliated to M.P.K.V., Rahuri)
Ref No:DYPES/DDYPCA/ 1148/2026-27
Date : 27/07/2026

# शिष्यवृत्ती नोटीस. नं. २

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध मॅटिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया अद्यायावत करण्यात आलेल्या महाडीबीटी २.० (MahaDBT 2.0) पोर्टलवर सुरू करण्यात आली आहे.

सदर प्रक्रिया अत्यंत महत्त्वाकांक्षी व मुदतीत पूर्ण करावयाची असल्याने समाज कल्याण कार्यालयाकडून खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

✧ **विद्यार्थ्यांनी करावयाची कार्ये**

१. **महाआयडी (Maha ID) नव्याने तयार करणे :-**

सर्व विद्यार्थ्यांसाठी महाआयडी(Maha ID)नव्याने तयार करणे बंधनकारक आहे. मागील पोर्टलवरील युझर आयडी/पासवर्डची आता गरज नाही.

२. **आधर आधारित नोंदणी :-**

विद्यार्थ्यांनी आपला आधार क्रमांक वापरून नवीन महाआयडी बनवावा. आधार पोर्टलवर आपली सर्व माहिती (पत्ता, मोबाईल, आणि बँक खाते) अचूक व अद्यायावत ठेवावी.

३. **दस्तऐवज संकलन:-**

आवश्यक सर्व कागदपत्रे (जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रके इत्यादी) स्पष्ट PDF स्वरूपात अपलोड करावीत.

४. **नवीन व नूतनीकरण अर्ज:-**

नवीन (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अशा दोन्ही अर्जासाठी नवीन महाआयडी/आधार लॉगीन करणे आवश्यक आहे. नूतनीकरणाच्या विद्यार्थ्यांनी लॉगिन नंतर "माझा अर्ज नूतनीकरण करावा" ही विशिष्ट टॅब निवडावी.

**वरील सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून आपला शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा शिष्यवृत्तीचा अर्ज ऑनलाईन भरलेल्या सर्व कागदपत्रासह ऑफीसमध्ये वेळेत जमा करावा.**

प्राचार्य
डॉ. डी. वाय पाटील कृषि महाविद्यालय,
तळसंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.